दि. 03/04/2023

म.टा. पान क्र. १

# राज्यात लाचखोरीची कोटी कोटी उड्डाणे

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

- तीन महिन्यांत २६ टक्क्यांनी वाढ
- सापळे व लाचखोरांमध्येही वृद्धी

नागपूरमध्ये 'एमआयडीसी'मधील एका अधिकाऱ्याने एक कोटीची लाच मागितली. या वर्षातील ही सर्वाधिक रक्कम आहे. तर दुसरीकडे विहिरीसाठी लाच मागितल्याचा निषेध करण्यासाठी संभाजीनगरमध्ये सरपंचानेच दोन लाख रुपये पंचायत समिती कार्यालयासमोर उडविले. यामुळे लाचखोर चांगलेच चर्चेत आले असतानाच, या वर्षाच्या पहिल्या तिमाहीत राज्यात लाचखोरीत २६ टक्क्यांनी वाढ झाल्याचे समोर आले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वतीने लावण्यात आलेले सापळे आणि पकडण्यात आलेल्या लाचखोरांमध्येही वृद्धी झाल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने राज्यभरात सन २०२२मध्ये जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांच्या कालावधीत १७४ सापळ्यांमध्ये (पान ८वर)



महसूल विभाग अव्वल

विभाग व लाचखोर

| महसूल | पंचायत समिती | विद्युत | अन्न व औषध |
|---|---|---|---|
| ७८ | २७ | १८ | १२ |
| पोलिस | नगर परिषद | महापालिका | जिल्हा परिषद |
| ३६ | १९ | १६ | ११ |

## नाशिक विभाग पुण्याच्या पुढे

पहिल्या तिमाहीतील आकडेवारी पाहिली, तर नाशिक विभाग लाचखोरांमध्ये पहिल्या स्थानावर आहे. बहुतांश वेळा पुणे विभाग लाचखोरीत प्रथम क्रमांकावर असतो, मात्र यावेळी पुण्याला मागे टाकत नाशिक पुढे गेले आहे. पुण्यामध्ये ४३ सापळ्यांमध्ये ६१ जणांना अटक करण्यात आली, तर नाशिकमध्ये ४५ सापळ्यांमध्ये ७० लाचखोर अडकले आहेत.

# लाचखोरीची कोटी कोटी उड्डाणे

(पान एकवरून) २२७ लाचखोरांना पकडले होते. यंदा सापळे आणि लाचखोर या दोन्ही संख्येत वाढ झाली आहे. चालू वर्षात २२० सापळ्यांमध्ये ३१३ लाचखोरांना अटक करण्यात आली आहे. सन २०२१मध्ये पहिल्या तीन महिन्यात सापळे आणि अटक लाचखोरांची संख्या अनुक्रमे २११ आणि २८४ अशी होती. लाचखोरांच्या या तिमाहीतील सर्वात मोठी रक्कम म्हणजे एक कोटी आहे. दोन महिलांनी केलेल्या तक्रारीवर आमदारांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित करू नये, यासाठी एक कोटी रुपयांची लाच नागपुरात मागण्यात आली होती. या लाचेचा २५ लाखांचा पहिला हप्ता घेताना 'एमआयडीसी'चा अधिकारी आणि खासगी एजंटला अटक करण्यात आली होती.

### नाशिक पहिल्या क्रमांकावर

| विभाग | सापळे | अटक |
|---|---|---|
| नाशिक | ४५ | ७० |
| पुणे | ४३ | ६१ |
| छ. संभाजीनगर | ३६ | ४९ |
| ठाणे | २७ | ३९ |
| नागपूर | २३ | ३६ |
| अमरावती | २० | २७ |
| नांदेड | १६ | १९ |
| मुंबई | १० | १२ |

### तिमाहीतील आकडेवारी

| | सन २०२३ | | सन २०२२ | | सन २०२१ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सापळे | अटक | सापळे | अटक | सापळे | अटक |
| जानेवारी | ५९ | ८० | ४६ | ६५ | ६२ | ८७ |
| फेब्रुवारी | ७५ | १११ | ५० | ६५ | ६६ | ८६ |
| मार्च | ८६ | १२२ | ७७ | ९५ | ८३ | १११ |

लोकमत पान क्र. ३

# अल्पवयीन मुलाचे अपहरण

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : नालासोपारा येथे ११ वर्षीय अल्पवयीन मुलाचे अपहरण केल्याची घटना समोर आली आहे. धानिवबाग परिसरात राहणारा अल्पवयीन मुलगा ३१ मार्चला सकाळी साडेआठच्या सुमारास घरातून बेपत्ता झाला होता. त्याचा सर्वत्र शोध घेऊनही तो न सापडल्याने त्याचे अपहरण झाल्याचा संशय आल्याने मुलाच्या वडिलांनी शुक्रवारी पेल्हार पोलिस ठाण्यात अपहरणाची तक्रार दाखल केली आहे.

# सातिवली जंगलात मृतदेह

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वसईच्या सातिवली जंगलात अनोळखी व्यक्तीचा गळफास लावलेला मृतदेह सापडल्याने एकच खळबळ उडाली आहे. सातिवली खिंड येथील डोंगरावरील जंगलात शनिवारी दुपारी एकच्या सुमारास सागाच्या झाडाला धोतर व दोरीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केलेल्या ५० ते ६० वयोगटातील पुरुषाचा मृतदेह आढळून आला होता. वालीव पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. वालीव पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

CamScanner

Scanned with CamScanner

दि. 03/04/2023


लोकमत पान क्र.1

देशात ६८ टक्के यूझर्स ठरले विविध गुन्ह्यांचे बळी

# सायबर क्राइममध्ये भारत जगात 'नंबर वन'

**महेश घोराळे**
लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** नोटाबंदी तसेच कोविडनंतर देशात ऑनलाइन सेवांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. मोबाइल इंटरनेटचा वापर चैनीबरोबरच सोयीचाही झाला. मात्र दुसरीकडे सायबर क्राइमच्या घटनांमध्ये भरमसाठ वाढ झाली. चिंतेची बाब म्हणजे सायबर क्राइम आणि त्याला बळी पडलेल्यांमध्ये जगात भारतीयांचे प्रमाण सर्वाधिक आहे. भारतात ६८% यूझर्सनी डिसेंबर २०२२ पर्यंत कोणत्या ना कोणत्या सायबर गुन्ह्याचा अनुभव घेतला आहे. नोव्हेंबर ते डिसेंबर २०२२ दरम्यानच्या एका सर्वेक्षणातून ही आकडेवारी पुढे आली आहे.




(स्रोत : स्टॅटिस्टा रिपोर्ट, डिसेंबर २०२२ पर्यंतची स्थिती)

## महाराष्ट्रातील स्थिती चिंताजनक

- सायबर विश्वातून होणारा पाठलाग अर्थात सायबर स्टॉकिंगमध्ये महाराष्ट्र २०२१ मध्ये देशात आघाडीवर होता. देशभरात सर्वाधिक प्रकरणे महाराष्ट्रातून समोर आली होती.
- अजूनही महाराष्ट्रात आक्षेपार्ह डाटा व्हायलर, ब्लॅकमेलिंग, ऑनलाइन आर्थिक फसवणूक, लॉटरी घोटाळे, लैंगिक छळ, बँकिंगशी संबंधित गुन्हे आदीचे प्रमाण चिंताजनक आहे.
- वाढते कॅशलेश व्यवहार, कोविडनंतर ऑनलाइन सेवांमध्ये झालेली वाढ याबरोबरच सायबर क्राइमचे प्रमाणही लक्षणीयरीत्या वाढले.

**अमेरिका अशा घटनांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहे. तेथे ४९% लोकांना सायबर क्राइमचा वाईट अनुभव आहे.**

पुढारी पु. पान क्र.2

# मिरा-भाईंदरमध्ये बंदुका बाळगणारे ७२ जण गजाआड

## अवैध शस्त्र बाळगल्याप्रकरणी चार वर्षात ४५ गुन्हे दाखल

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये २०१९ सालापासून अवैध अग्निशस्त्र बाळगणे व विक्री प्रकरणी ४५ गुन्हे दाखल करण्यात आले. सदर कारवाया गेल्या ४ वर्षांत करण्यात आल्या असून या प्रकरणी ७२ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये शांतता, कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी, नागरिकांचे जीवित व वित्त सुरक्षित राहण्याची तसेच समाजकंटक व गुंड प्रवृत्तिचे लोक यांच्या वर प्रतिबंधक कारवाई करणे सोपे व्हावे यासाठी महाराष्ट्र पोलिस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७ चे पोटकलम (१) व (३) अनवये मनाई आदेश लागू करण्यात आलेले आहेत. यामध्ये कोणत्याही नागरिकांच्या शरीरास ईजा होईल अशा प्रकारची कोणतीही शस्त्रे जवळ ठेवण्यास मनाई करण्यात आलेली आहे. मनाई आदेशाचा भंग करणाऱ्यावर पोलिसांकडून कारवाई करण्यात येते व यापुढे देखील कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस आयुक्तालयाकडून सांगण्यात आले आहे. असे मनाई आदेश असताना देखील काही व्यक्तींनी या आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

आयुक्तालयातील सर्व पोलिस ठाणे कार्यक्षेत्रामध्ये अवैध अग्नीशस्त्र बाळगणाऱ्यावर २०१९ मध्ये १६ गुन्हे दाखल असून ३२ आरोपींना अटक करण्यात आली आहे तर त्यांच्याकडून देशी कट्टे ११, पिस्टल ७, बोअर पिस्तूल १, कांडतूस ४१ असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. २०२० साली ३ गुन्हे दाखल असून ४ आरोपींना अटक करून त्यांच्याकडून गावटी कट्टे २, बनावट ९ एम एम पिस्टल-१ असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. २०२१ मध्ये १५ गुन्हे दाखल असून ३२ आरोपींना अटक करून त्यांच्याकडून गावठी कट्टे १५, पिस्टल १, बारा बोअर १, काडतुस २५ असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. २०२२ मध्ये १ गुन्हा दाखल असून १ आरोपीला अटक करून २४ काडतुस जमा करण्यात आलेली आहेत, तर १ जानेवारी २०२३ ते ३० मार्च २०२३ या तीन महिन्यांमध्ये ५ गुन्हे दाखल असून ७ आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून गावठी पिस्तुल, गावठी कट्टा, देशी पिस्तूल व १० जीवंत काडतूस जमा केले आहेत.

CamScanner
Scanned with CamScanner

दि. 03/04/2023

पुढारी पान क्र. 5

# केवायसी अपडेट करण्याच्या नावाखाली दीड लाखाची फसवणूक

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

नवघर पोलीस ठाणेहद्दीत राहणारे ललित जैन यांना केवायसी अपडेट केलेला नाही, तुमचा केवायसी अपडेट करून देतो असे सांगून ऑनलाइनद्वारे १ लाख ४९ हजार ४९९ रुपयाची फसवणूक केली आहे. त्याबाबत नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाईंदर पूर्वेच्या न्यू गोल्डन नेस्ट परिसरात ललित कन्हैलाल जैन हे परिवारासोबत राहत असुन त्यांना एका अनोळखी इसमाने फोन करून सांगितले की, तुमचे केवायसी अपडेट केलेले नाही, तुम्हाला केवायसी अपडेट करावे लागेल. मी तुमचे आनलाईन केवायसी अपडेट करुन देतो. त्यासाठी तुम्हाला ॲप डाऊनलोड करण्यास सांगीतले. त्यानंतर जैन यांनी ॲप डाऊनलोड केले. त्यानंतर त्याव्यक्तीने जैन यांना ४९९९ असा नंबर टाका त्यानंतर तुमचे केवायसी अपडेट होईल असे सांगितले. त्यानंतर जैन यांनी फोनपे ॲपद्वारे ४९९९ असा नंबर टाकल्यावर त्यांच्या बँक खात्यामधून ४९९९ रुपये कट झाले. त्यानंतर त्या व्यक्तीने वेगवेगळे नंबर टाकण्यास सांगितले तेव्हा त्यांच्या खात्यामधून ते पैसे कट झाले. त्या अनोळखी व्यक्तीला पैसे कट झाल्याचे सांगितले असता त्याने तुमचे पैसे परत येतील असे सांगीतले. त्यानंतर त्या व्यक्तीला पैसे परत करण्यास सांगितले असता पैसे परत केले नाही. या प्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गुटखा विक्री करणाऱ्यावर कारवाई

**मिरारोड :** भाईंदर पश्चिमेच्या मुर्धागाव येथे अवैधरीत्या गुटखा पानमसाला विक्री करणाऱ्यावर पोलिसांनी कारवाई करून भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. भाईंदर पोलीस ठाण्यातील पोलीस हे शुक्रवारी दुपारी पेट्रोलिंग करत असताना डायल ११२ या नंबरवर एका व्यक्तीने फोन करून वजीर मटन शॉपचे शेजारी, मनपा शाळेपुढे, मुर्धागाव येथे एक व्यक्ती हा अवैधरीत्या गुटखा पानमसाला विक्री करत असल्याची माहिती दिली. मिळालेल्या माहितीनुसार त्या ठिकाणी जावुन पाहणी केली असता त्यांठिकाणी फोन केलेल्या व्यक्तीने गुटखा विक्री करणाऱ्याला पकडुन ठेवले होते.

त्या इसमाची झडती घेतली असता दोन गोण्यामध्ये अवैधरीत्या गुटखा पानमसाला असल्याचे दिसून आले. त्या इसमाचे नाव अशोककुमार कालीशंकर साहु असे असून त्याच्याकडे मिळुन आलेला माल जप्त करण्यात आला आहे. त्याच्याकडे १९,७६० रुपये किमतीचा गुटखा मिळून आला. प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुचा माल स्वतःचे फायद्यासाठी अवैधरीत्या बाळगल्याने भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुण्यनगरी पृ. पान क्र. 1

# मीरा-भाईंदरमध्ये सावरकर गौरव यात्रेला प्रतिसाद

**मीरा रोड :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या सततच्या अवमानकारक आणि दिशाभूल करणाऱ्या विधानांना विरोध करण्यासाठी भाजप व शिवसेनेकडून सावरकर गौरव यात्रा काढण्यात येत आहे. त्याचाच भाग म्हणून मीरा-भाईंदर शहरात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी भाजप आणि शिवसेना यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी सावरकर गौरव यात्रा काढण्यात आली.

भाजप जिल्हाध्यक्ष ॲड. रवी व्यास यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या गौरव यात्रेत मोटारसायकल, कार, खुल्या जीप आदींमधून नागरिक गौरव यात्रेत सहभागी झाले होते. यावेळी बोलताना रवी व्यास म्हणाले की, वीर सावरकरांनी हिंदू राष्ट्रवादाच्या विचारसरणीला केवळ बळ दिले नाही तर पुढे नेले. लंडनमध्ये ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध क्रांतिकारी आंदोलन करणारे ते भारतातील पहिले व्यक्ती होते. भारतमातेच्या अशा शूर सुपुत्राचा संपूर्ण देशवासीयांना अभिमान आहे. भाईंदर पश्चिमेतील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानापासून सुरू झालेल्या आणि काशिमीरा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत गौरव यात्रा काढण्यात आली. वीर सावरकर गौरव यात्रेत सहभागी झालेल्या प्रमुख व्यक्तींमध्ये शिवसेना आमदार प्रताप सरनाईक, आमदार गीता जैन, सर्व नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी व नागरिकांचा समावेश होता.

# नवघर पोलीस ठाण्याचे मिलिंद देसाई यांची बदली

## गुटखा वसुली प्रकरण तापले

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलिंद देसाई यांची बदली करण्यात आली आहे. नवघर पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदाराने गुटखा विक्रेत्याकडून लाच घेताना लाचलुचपत विभागाने दोन दिवसांपूर्वी अटक केली आहे. यावरून गुटखा वसुली प्रकरण तापले असल्याचे दिसून येते.

नवघर पोलीस ठाण्यात मिलिंद देसाई हे जवळपास गेल्या दीड वर्षांपासून कार्यरत होते. गेल्या अनेक दिवसांपासून नवघर पोलीस ठाणे हद्दीत गुटखा विक्रीच्या तक्रारी आहेत. दोन दिवसांपूर्वी एका पोलीस हवालदाराला गुटखा विक्रेत्याकडून लाच घेताना पकडले आहे. त्यावरून गुटखा माफिया पुन्हा सक्रिय झाल्याचे दिसून येत आहे. देसाई यांच्या जागी काशिमीरा पोलीस ठाण्यातील विजय पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. देसाई यांची पोलीस मुख्यालयात नियंत्रण कक्षामध्ये बदली करण्यात आली आहे. तर विजय पवार यांच्या जागी पोलीस मुख्यालयात विशेष शाखेतील कुमारगौरव धादवड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

CS CamScanner

Scanned with CamScanner

सकाळ पू.पान क्र.3 दि.03/04/2023

# जनतेच्या दरबारात काँग्रेस जिंकेल

## वसई काँग्रेस ग्रामीणचे अध्यक्ष राम पाटील यांचा विश्वास

विरार, ता. २ (बातमीदार) : लोकशाही, संविधान व देश वाचवण्यासाठी काँग्रेस जनतेच्या दरबारात लढाई लढून जिंकेल, असा ठाम आत्मविश्वास काँग्रेसचे वसई तालुका ग्रामीण अध्यक्ष राम पाटील यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी संसदेत अदाणी घोटाळ्यावर मोदी सरकारला प्रश्न विचारल्यानंतर नऊ दिवसांनी राहुल गांधी यांच्याविरोधातील मानहानीचे प्रकरण बाहेर काढण्यात आले. राहुल गांधी यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आणि २४ तासांतच त्यांची खासदारकी रद्द करून सरकारी निवासस्थान खाली करण्याची नोटीस पाठवली. यावरून मोदी सरकार राहुल गांधी यांच्यावर सूडबुद्धीने कारवाई करीत आहे हे सिद्ध झाले आहे, असेही राम पाटील यांनी सांगितले.

सकाळ पू.पान क्र.1

# वीज दरवाढीला वसईतून विरोध

विरार, ता. २ (बातमीदार) : महावितरण कंपनीच्या वीजदरात नुकताच वाढ झाली आहे. मात्र महावितरणाच्या या वीज दरवाढीला वसईकरांतून विरोध करण्यात येत आहे. ही वीज दरवाढ म्हणजे वीज चोरी, गळती आणि भ्रष्टाचाराची ग्राहकांकडून वसूली आहे, अशा संतप्त प्रतिक्रिया वसईकरांतून व्यक्त होत आहेत. वीजदर कमी करण्याऐवजी वीजदर वाढविण्यात आल्याचा आरोप जनता दलाच्या मनवेल तुस्कानो यांनी केला आहे

राज्य वीज नियामक आयोगाने महावितरण सह इतर खासगी कंपन्यांचे वीजदर नुकताच जाहीर केले आहेत. यामध्ये महावितरणचा १०१ ते ३०० युनिट विजेचा दर १० रुपये ८१ पैसे असा आहे. वसई विरार भागात सध्या महावितरण कंपनीतर्फे वीजपुरवठा केला जातो. त्यामुळे या वीजदरवाढीचा फटका वसई विरार ला देखील बसणार आहे. त्यामुळे या वीज दरवाढीला वसईकरांनी विरोध दर्शविला आहे. वीजदरवाढीचा प्रस्ताव आयोगापुढे ठेवण्यात आला होता. त्यावेळी, वसईतून हरकती नोंदविण्यात आल्या होत्या. त्यामुळे आधीच वीजदर कमी करण्याऐवजी वीजदर वाढवल्याचा आरोप जनता दलाच्या मनवेल तुस्कानो यांनी केला.

सकाळ पू.पान क्र.2

# वसईत शिवशक्तीला भीमशक्तीचे बळ

विरार, ता. २ (बातमीदार) : वसई-विरारमध्ये शिवसेनेच्या मागे भीमशक्ती नेहमीच सावलीसारखी उभी राहिली आहे. विरार-आगाशी येथील आंबेडकर नगर येथे कार्यकर्त्यांच्या प्रवेश सोहळ्याच्या निमित्ताने या ऐक्याची प्रचीती आली आहे. आगाशी, चाळपेठ, अर्नाळा व उंबरगोठण, आगाशी आंबेडकर नगरमधील सहा पाड्यांचे नेतृत्व करणारे प्रभाकर वागळे व त्यांच्या कार्यकर्त्यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात जाहीर प्रवेश केला. या कार्यकर्ता प्रवेशाच्या निमित्ताने शिवशक्तीला भीमशक्तीचे पुन्हा एकदा बळ मिळाले आहे.

पालघर जिल्हा संपर्कप्रमुख सुनील शिंदे तसेच पालघर जिल्हाप्रमुख पंकज देशमुख यांच्या उपस्थितीत झालेल्या या प्रवेश सोहळ्यात शेकडो कार्यकर्ते तसेच महिलांनी शिवबंधन बांधले. आपल्या विभागात तसेच तालुक्यात शिवसेना पक्ष वाढीकरिता जोमाने प्रयत्न करा, असे आवाहन आमदार तथा पालघर जिल्हा संपर्कप्रमुख सुनील शिंदे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना केले; तर विविध शिबिरे व सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून आपला पक्ष घराघरांत नेऊ, असा विश्वास जिल्हाप्रमुख पंकज देशमुख यांनी दिला. शिवसेना जिल्हा संघटक किरण चेंदवणकर यांनीही महिलांनी आघाडीवर राहून बचत गट काढावेत, तसेच विविध माध्यमांतून शिवसेना पक्षवाढीचे काम करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

CS CamScanner

Scanned with CamScanner

दि. 03/04/2023

सकाळ पान क्र.5

# पोलिस भरतीच्या लेखी परीक्षेत डमी परीक्षार्थी

## हवालदारांच्या सतर्कतेमुळे आरोपी ताब्यात; राबोडी पोलिस ठाण्यात गुन्हा



विकास जोनवाल

ठाणे, ता. २ (वार्ताहर) : ठाणे शहरातील राबोडी येथील सरस्वती विद्यालयात पोलिस भरतीच्या लेखी परीक्षेत उमेदवाराच्या जागी आलेल्या डमी परीक्षार्थीला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडे संशयास्पद वस्तू आढळल्याने त्याच्याविरोधात राबोडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

राबोडीतील सरस्वती विद्यालय राज्यातील पोलिस भरतीसाठी लेखी परीक्षेचे क्र. ९ हे केंद्र आहे. या शाळेत रविवारी (ता. २) परीक्षेसाठी आलेल्या उमेदवारांची प्रवेशद्वारावर तपासणी सुरू होती. पोलिस हवालदार ईश्वर घोलवड यांना एका परीक्षार्थीच्या संशयास्पद हालचाली दिसून आल्या. विकास भवरसिंग जोनवाल (रा. जिल्हा औरंगाबाद) याची अधिक तपासणी केली असता त्याच्याकडे आक्षेपार्ह वस्तू आढळल्या. त्याच्या गुडघ्याच्या संरक्षणाकरिता वापरण्यात येणाऱ्या नी कॅपच्या आत इलेक्ट्रॉनिक वॉच, तसेच ब्लूटूथबरोबर जोडलेले एक इलेक्ट्रॉनिक उपकरण, तसेच कानात एक अतिसूक्ष्म ब्लूटूथ उपकरण असे साहित्य आढळून आले. त्याला ताब्यात घेत अधिक चौकशी केली असता, तो डमी परीक्षार्थी असल्याचे समोर आले. मूळ उमेदवार बाळाजी बाबू कुसळकर याच्या जागेवर बेकायदा लेखी परीक्षा देण्यासाठी आल्याचे त्याने सांगितले.

### हवालदाराला अटक

अलिबाग (बातमीदार) : पोलिस भरतीच्या लेखी परीक्षेत मदत करण्यासाठी एक लाख रुपये घेणाऱ्या नवी मुंबईमधील पोलिस हवालदार प्रशांत मोकल याला अटक केली. एका उमेदवाराच्या पालकांच्या तक्रारीनुसार रोहा पोलिसांनी त्याच्याविरोथात शुक्रवारी (ता. ३१) गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याला न्यायालयाने चार दिवसांची कोठडी सुनावली आहे.

लोकमत पृ.पान क्र.1

# राजकारण्यांमुळे मीरा-भाईंदर विद्रूप

धीरज परब

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदरमध्ये बहुतांश राजकारण्यांनी बेकायदा फलक व कमानी उभारल्याने शहर विद्रूप होत आहे. महापालिका प्रशासन तक्रार आल्याशिवाय कारवाई करत नाही. झाडांवरही फलक लावून पर्यावरणाची हानी करतानाच, पालिकेचेही मोठे आर्थिक नुकसान केले जात आहे. शहरात वाढदिवस, नियुक्ती, सण-उत्सव, कार्यक्रम, मोठ्या नेत्याचे आगमन आदी विविध कारणांनी फलकबाजी केली जात आहे.

महापालिकेचे प्रभाग समिती स्तरावरचे अधिकारी - कर्मचारी स्वतःहून बेकायदा फलक तत्काळ काढत नाहीत, तसेच गुन्हे दाखल करत नाहीत. सत्यकाम फाउंडेशनचे कृष्ण गुप्तासारख्या मोजक्या सामाजिक कार्यकर्त्यांच्या तक्रारी सातत्याने होत असल्याने, महापालिका तक्रारी आल्यानंतर का होईना, फलक काढून गुन्हे दाखल करते. तक्रारीवरून पोलिसही गुन्हा दाखल करू शकतात. गुप्ता यांच्या तक्रारींवरून दोन गुन्हे पोलिसांनी दाखल केले आहेत. आतापर्यंतच्या गुन्ह्यांत पोलिसांनी काय तपास केला, यांचा आढावा घेणे आवश्यक आहे. अनेक प्रकरणांत राजकीय वजन पाहून पालिका गुन्हा दाखल करत नाही वा विलंबाने करते. स्वतः बेकायदा फलकबाजी करणारे मात्र राजकीय विरोधकांनी फलक लावल्यास अधिकाऱ्यांना दूरध्वनी करून कारवाई करण्यास सांगतात.

### जनसंपर्क अधिकारीही माहितीविना

- प्रमुख गर्दीची ठिकाणे, नाके, वाहतूक बेट, सिग्नल, विजेच्या खांबापासून झाडांवर सर्रास बेकायदा फलक, तसेच रस्त्यांवर कमानी उभ्या केल्या जातात. बेकायदा फलक लावल्याने रहदारी - वाहतुकीला अडथळा होतो. याशिवाय शहर विद्रूप - बकाल दिसते. झाडांवर फलक लावल्याप्रकरणी वृक्ष कायद्यानुसार गुन्हा दाखल केला जात नाही.
- फलक काढण्यासाठी मनुष्यबळ व वाहन आदींवर लाखोंचा खर्च होऊन, भुर्दंडही पडतो. बेकायदा बॅनर-कमान लावणाऱ्यांकडून पालिकेने दंड व खर्च आदी वसूल करणे आवश्यक आहे, पण तसे होत नाही. पालिकेने किती फलकांवर कारवाई करून गुन्हे दाखल केले, याची माहिती विचारून जनसंपर्क अधिकारी राज घरत यांना देता आली नाही.

CamScanner

Scanned with CamScanner

# पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा शांततेत पार

## परीक्षेच्या वेळी कोणताही गैरप्रकार नाही

भाईंदर - मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यालयामार्फत महाराष्ट्र पोलीस भरती २०२१ अंतर्गत २ एप्रिलला पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्यात आली आहे. परीक्षेसाठी एकूण १२,१२७ पात्र उमेदवार होते.

मोठ्या पोलीस बंदोबस्तात पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा शांततेत पार पडली आहे. परीक्षेच्या वेळी कोणताही गैरप्रकार घडलेला नसल्याची माहिती पोलीस आयुक्तालयाकडून देण्यात आली आहे. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कमी मनुष्यबळाचा प्रश्न लवकरच सुटणार असून, लेखी परीक्षा पास झाल्यानंतर ९९६ पोलीस शिपाई आयुक्तालयाला प्राप्त होणार आहेत.

लेखी परीक्षेकरिता आयुक्तालयामार्फत नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान व स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे मैदान या दोन मैदानांची निवड करण्यात आली होती. लेखी परीक्षेसाठी एकूण १२,१२७ पात्र उमेदवार होते. त्यापैकी ३,२६९ महिला व ८,८५८ पुरुषांचा समावेश होता. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे मैदान याठिकाणी महिलांची लेखी परीक्षा घेण्यात आली असून, पुरुषांची लेखी परीक्षा सुभाषचंद्र बोस मैदान येथे घेण्यात आली आहे. लेखी परीक्षेसाठी आलेल्या महिला उमेदवारांपैकी ज्या महिलांना १ एप्रिलला रात्री मीरा-भाईंदर शहरात आल्यानंतर राहण्याची सोय उपलब्ध होऊ शकत नव्हती, अशा महिलांना मीरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत स्वर्गीय प्रमोद महाजन सभागृह, स्वर्गीय मीनाताई ठाकरे सभागृह, आप्पासाहेब धर्माधिकारी सभागृह येथे राहण्यासाठी विनामूल्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती.

भरती परीक्षेच्या वेळी गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी व उमेदवारांवर लक्ष ठेवण्यासाठी जवळपास ५० कॅमेरे लावण्यात आले होते. पोलिसांचे सीसीटीव्ही, भरती प्रक्रिया पार पाडणाऱ्या कंपनीचे कॅमेरे व हँडीकॅमद्वारे चित्रीकरण करण्यात आले आहे. यामुळे संपूर्ण प्रक्रियेवर कॅमेऱ्याची बारीक नजर आहे. भरती प्रक्रिया पहिल्यांदाच आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने होत असल्याने येणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला संगणकीय चिप लावण्यात आली असून, या प्रत्येक उमेदवाराची नोंद संगणकात करण्यात आली आहे. सकाळी ५ वाजता उमेदवारांची नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात येत होती. भरती प्रक्रियेसाठी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली असून, अतिरिक्त पोलीस आयुक्तांच्या नेतृत्वाखाली, मुख्यालय उपायुक्त, तीन सहाय्यक आयुक्त, २१ पोलीस निरीक्षक, ३६ सहाय्यक पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षक आणि २३१ पोलीस कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली होती. उमेदवारांसाठी स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी तसेच नाष्टा आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

Scanned with CamScanner

पुढारी

# फसवणूककांडात बँकेचा अधिकारी गजाआड

## ऑनलाईन लुटण्यासाठी उघडले १५ बोगस अकाऊंट, मुंबई पोलिसांची पुण्यात कारवाई

**ठाणे : संतोष बिचकुले**

नागरिकांना ऑनलाईन लुटण्यासाठी १५ बोगस अकाऊंट उघडून भामट्यांना पासबुक, एटीएम कार्ड देणाऱ्या एचडीएफसी बँकेच्या सेल्स अधिकाऱ्याला गजाआड करण्यात आले आहे. ही कारवाई मुंबईच्या पवई पोलिसांनी पुण्यात केली. या आरोपीला न्यायालयाने ५ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. सदर कारवाईमुळे महाराष्ट्र व परराज्यातील मोठे रॅकेट उघडकीस येणार असल्याने आरोपीचे नाव गुपित ठेवण्यात आल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.



### तामिळनाडूतील गुन्ह्यांची होणार उकल

आरोपी सेल्स अधिकाऱ्याला लेबर कॉन्ट्रॅक्टर पॅनकार्ड, आधार कार्ड देत असे. त्याआधारे त्याने ५ कंपन्यांचे कोड वापरून १५ बोगस सॅलरी अकाऊंट उघडले होते. त्यापैकी दोन अकाऊंट तामिळनाडू पोलिसांनी फ्रीज केले आहेत. त्यामुळे तामिळनाडूतील दोन गुन्ह्यांची उकल होणार असल्याचे पोलीस सूत्रांनी दैनिक 'पुढारी'ला सांगितले.

पवई परिसरातील सूरज शर्मा (३०, बदललेले नाव) याला गॅस एजन्सी सुरू करायची होती. त्यासाठी त्याने गुगलवर सर्च केले असता नामांकित गॅस कंपनीची बोगस वेबसाईट त्याच्या निदर्शनास पडली. त्यावर नमूद असलेल्या ई-मेलवर सूरजने एजन्सीबाबत माहिती विचारली. एजन्सी सुरू करण्यासाठी लागणारी माहिती त्याला मेलद्वारे प्राप्त आली. एजन्सीसाठी त्याने अर्ज केला असता नियम व अटींची पूर्तता करण्यासाठी वेळेवेळी त्याच्याकडून ६ लाख ८८ हजार ८१६ रुपये ऑनलाईन ट्रान्सफर करून घेतले. आणि बोगस कागदपत्रे त्याला ई-मेलवर पाठवली. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच सूरज याने पवई पोलीस ठाण्यात तक्रार केली. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला. या गुन्ह्याचा तपास सुरू असताना सूरजने पैसे ट्रान्सफर केलेल्या अकाऊंटची पडताळणी केली असता पुण्यातील एचडीएफसी बँकेच्या एका ब्रँचची माहिती समोर आली. त्यानुसार उपायुक्त डॉ. महेश्वर रेड्डी, वपोनि बुधन सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि सुधीर पिलाणे, अंमलदार संदीप राठोड, अर्जुन रोठड, पिसाळ यांनी पुणे गाठले. सूरजने ट्रान्सफर केलेले लाखो रुपये भामट्याने दुसऱ्या अकाऊंटमध्ये ट्रान्सफर केले होते. त्या दोन्ही अकाऊंटचा केव्हायसी क्रमांक एकच असल्याचे तपासादरम्यान निष्पन्न झाले. त्यामुळे तपासी पथकाने बँकेतील सेल्स अधिकाऱ्याची चौकशी केली असता फसवणूककांडाचे रॅकेट उजेडात आले. आरोपी सेल्स अधिकाऱ्याने आतापर्यंत १५ बोगस अकाऊंट उघडल्याची कबुली दिली आहे.

Thane Edition
Apr 3, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

Scanned with CamScanner

# रमजान का फायदा उठा कर की चोरी : पुलिस ने दस घंटे में पहुंचाया हवालात

**भायंदर :** काशीमीरा पुलिस स्टेशन की हद में एक चोर ने रमजान का फायदा उठाकर एक व्यक्ति के घर में घुसकर करीब 23 लाख पर हाथ साफ कर नौ दो ग्यारह हो गया मगर पुलिस ने महज 10 घंटो में ही तब हिरासत में लिया जब वह अन्य राज्य में भागने की तैयारी में था।

प्राप्त जानकारी के अनुसार अकबर अली महोम्मद अली चुड़िहार रमजान माह होने से 23 मार्च चंद्र दर्शन करने गोरेगांव गए हुए थे! उसी दौरान एक अज्ञात चोर ने उनके घर की खिड़की काट कर अलमारी में रखे 293 ग्राम सोने के आभूषण जिसकी कीमत 14 लाख 65 हजार बताई बताई जाती है उसी प्रकार 70 हजार कीमत के 1 किलो चांदी के आभूषण तथा 7लाख 75 हजार 700 रुपए नकद लेकर फरार हो गया! इसकी जानकारी जब पीड़ित को मिली तो काशीमीरा पुलिस स्टेशन में शिकायत पर पुलिस ने दफा 454,457 तथा 380 के तहत मामला दर्ज कर काशीमीरा के वरिष्ठ पुलिस निरीक्षक संदीप कदम ने इसकी जांच अपराध शाखा के पुलिस निरीक्षक प्रशांत गागुर्डेको सोपी!

अपराध शाखा ने अपने सूत्रों से जब इसकी छानबीन की तो अब्दुल शेख उर्फ अब्दुल चीरा (46,) नाम सामने आया तो पुलिस ने उसे तब नालासोपारा स्टेशन से गिरफ्तार किया जब वो अन्य राज्य में भागने की फिराक में था।

पुलिस ने उसे गिरफ्तार कर 23 लाख 10 हजार का मुद्दमाल बरामद किया है। आरोपी के खिलाफ मुंबई ठाणे पालघर अजमेर सहित कई पुलिस स्टेशनों में करीब 40 घर चोरी के मामले दर्ज है।

साथ ही यह शातिर जब भी कोई वारदात करता तो सबूत नहीं छोड़ता था परंतु मीरा भायंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय ने उसे महज 10 घंटो में ही गिरफ्तार कर उसकी करतूतों पर पूर्ण विराम लगा दिया!यह कार्यवाही पुलिस कमिश्नर मधुकर पांडे, अपर पुलिस आयुक्त श्रीकांत पाठक, पुलिस उपायुक्त जयंत बजवले, सहायक पुलिस उपायुक्त विलास सानप के मार्गदर्शन में काशीमीरा पुलिस निरीक्षण संदीप कदम तथा अपराध शाखा के विजय पवार सहित पुलिस कर्मचारियों ने करके महज दस घंटो में ही आरोपी को गिरफ्तार करने में सफलता प्राप्त की है।

# नागपुर मंडल के कैरिज और वैगन विभाग के वरिष्ठ अनुभाग अभियंता नए आविष्कार के लिए सराहना मिली



**नागपुर :** नरेश ल. जिद्देवार मध्य रेल के नागपुर मंडल में वरीष्ठ खंड अभियंता , संरक्षा सलाहकार के पद पर कार्यरत है, रेलवे के वैगनो में एम्पटी लोड बॉक्स नाम का उपकरण लगा होता है जो की गाड़ी का ब्रेक पॉवर खाली तथा लोडेड स्थिति में नियंत्रित करता है. श्री जिद्देवार ने प्रचलित उपकरण में कुछ परिवर्तन प्रस्तावित किये है जिसका निरिक्षण अनुसन्धान, डिजाईन एंड स्टैण्डर्ड आर्गेनाईजेशन लखनऊ

## वेश्याव्यवसाय करण्यास प्रवृत्त करणाऱ्या...

नालासोपाराच्या पोलीस पथकाला मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतूक कक्ष नालासोपाराचे प्रभारी अधिकारी संतोष चौधरी यांनी पोलीस स्टाफ, बोगस गिऱ्हाईक व दोन पंचांसह तुंगारेश्वर फाटा, वसई (पूर्व) या ठिकाणी सापळा रचून अचानक छापा मारला. या छापा कारवाई दरम्यान वेश्या दलाल हरेश्वर केशव राऊत रा. चिखल डोंगरे, विरार (पश्चिम) आणि गुंडम्मा रानप्पा भांगी उर्फ राजश्री रा. अंधेरी, मुंबई या दोघांना ताब्यात अटक केली. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेल्या रिक्षासह एकूण एक लाख २६७०

Scanned with CamScanner

लोकमत

# दुचाकी-चारचाकीचा रंग बदलताय; आरटीओकडे पैसे भरलेत का?

## परस्पर बदल हा कायद्याने गुन्हा : परिवहनची परवानगी आवश्यक

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : आपले वाहन आकर्षक, दिसावे याकरिता अनेक दुचाकी, चारचाकीधारक वाहनांचा रंग, चेसिस व अन्य बदल करून मॉडिफाय करतात. मात्र, त्यासाठी उपप्रादेशिक परिवहन विभागाची परवानगी घेऊन शुल्क भरावे लागते. अन्यथा दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागते.

वाहन आकर्षक दिसावे म्हणून रंगरंगोटी, कारच्या नंबर प्लेटमध्ये कलाकुसर करणाऱ्यांची संख्या जास्त आहे; परंतु अनेक जण परस्पर बदल करतात. हा कायद्याने गुन्हा आहे. अनेक वेळा चोरीच्या काही दुचाकी 'मॉडिफाय' करून वापरात आणल्या जातात. त्या नव्याकोऱ्या दिसल्याने त्यांची तपासणी होत नाही. मॉडिफाय दुचाकीची नंबरप्लेट व चेसिस, इंजिन नंबर यांची पडताळणी केल्यानंतर दुचाकीचा इतिहास समोर येतो. काही बदल करण्यासाठी शासनाकडून शुल्क ठरवून दिले आहेत. त्याबाबत आरटीओ दप्तरी नोंद घेतली जाते.



दुचाकीला २००
चारचाकीला ४०० रुपये



वाहनांत बदल करताना आरटीओकडे परवानगी घेताना शुल्क भरावे लागते. दुचाकीसाठी २०० रुपये तर चारचाकीसाठी ४०० रुपये शुल्क भरावा लागतो. मात्र, अनेक जण हे शुल्क न भरता वाहनात बदल करतात. त्यामुळे एखादे वाहन विनापरवानगी मॉडिफाय केलेले आढळून येताच, त्यावर दंडात्मक कारवाई केली जाते.

### वाहन विक्री, विमा करताना अडचण

आरटीओ विभागाची परवानगी न घेता दुचाकी अथवा चारचाकी वाहनात बदल केल्यास वाहन विक्री करताना, तसेच विमा करताना अडचणी निर्माण होतात. त्यामुळे वाहनांचा रंग आणि रचनेत परस्पर बदल न करता नियमांचे पालन करणे फायदेशीर असते.

### मॉडिफाय केलेल्या वाहनांची संपूर्ण माहिती आरटीओत

- मागील वर्षी अल्टरेशन शुल्क भरलेली शेकडो वाहने आहेत. दरम्यान, एकूण मॉडिफाय वाहनांमध्ये एलपीजी किट बसवणाऱ्या वाहनांची संख्या अधिक आहे.
- रीतसर परवानगी घेणाऱ्या मॉडिफाय केलेल्या वाहनांच्या संपूर्ण माहितीची नोंद आरटीओमध्ये केली जाते.

### वर्षभरात शेकडो वाहनधारकांनी केला आपल्या वाहनांमध्ये बदल

- गतवर्षाच्या कालावधीत दुचाकी व चारचाकी मिळून शेकडो वाहनधारकांनी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची रीतसर परवानगी घेत वाहनात बदल केले आहेत तर, अनेक वाहनचालकांना या नियमाविषयी माहितीच नसल्याचे दिसून येते. त्यामुळे आरटीओ विभागाचा महसूल तर बुडतोच, शिवाय वाहनचालकांनादेखील विविध समस्यांना सामोरे जावे लागते.



अनेक जण वाहनांमध्ये परस्पर बदल करून मॉडिफाय करतात, तसेच वाहनांवर रंगरंगोटी, कारच्या नंबर प्लेटमध्ये कलाकुसर करणे हा कायद्याने गुन्हा आहे.

- प्रवीण बागडे, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, विरार.



Scanned with CamScanner

दैनिक
आमची मुंबई
ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.
वर्ष : १२ | अंक : ०१६ | शनिवार ०१ एप्रिल २०२३ | Post-Reg-No. PLG/158/2022-2024 | रु. २ | पाने ०४

# अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या कारवाईने दोन महिलांची सुटका

**वसई.** वेश्याव्यवसायाला चिथावणी देणाऱ्या आरोपींना अटक करण्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा पथकाला यश आले असून, दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे. डीसीपी (गुन्हे) अविनाश अंबुरे आणि एसीपी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी तस्करी कक्षाचे पोलीस अधिकारी-कर्मचारी, नालासोपारा पीआय संतोष चौधरी यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

अशी माहिती पोलीस अधिकाऱ्याने शुक्रवारी दिली. पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, अनैतिक मानवी तस्करी कक्षा, नालासोपारा यांना २९ मार्च रोजी वेश्याव्यवसायात (१) हरेश्वर केशव राऊत (२५) गुंडम्मा रामप्पा भांगी उर्फ राजश्रीने महिलांना पैशाचे आमिष दाखवून त्यांना वेश्याव्यवसाय करण्यास भाग



पाडल्याची माहिती मिळाली. महिला पुरवण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या ग्राहकांना बोलावून त्या बदल्यात पुरुष ग्राहकांकडून पैसे घेतात. मिळालेल्या माहितीच्या आधारे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने नालासोपाऱ्याचे पीआय संतोष चौधरी यांनी कायदेशीर कारवाई केली आहे.या प्रकरणाची पूर्तता केल्यानंतर, पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तुंगारेश्वर फाटा, वसई पूर्व येथे पोलीस कर्मचाऱ्यांनी बोगस ग्राहक व दोन पंचांसह छापा टाकला. त्यावेळी आरोपी (१) हरेश्वर केशव राऊत, रा. चिखल डोंगरी, विरार पश्चिम आणि (२) गुंडम्मा. याप्रकरणी राणाप्पा भांगी उर्फ राजश्री, रा.अंधेरी मुंबई याला ताब्यात घेण्यात आले असून, या प्रकरणी पोलीस हवालदार बापू पवार यांनी आरोपीविरुद्ध कलम ३७०(१)(३), ३४ कम अनैतिक वाहतूक नुसार पेल्हार पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल केला आहे. प्रतिबंध कायदा १९५६, कलम ४,५. पोलीस अधिक तपास करत आहेत.

Scanned with CamScanner

दैनिक

# मुंबई केसरी टाइम्स

R.N.I. NO MAHHIN/2008/25162

एक साथ प्रकाशित, पालघर, ठाणे, मुंबई.

www.mumbaikesaritimes.com

वर्ष : १५ अंक : 293 शनिवार ०१ एप्रिल २०२३ मूल्य 2 रुपए Post-Reg- No. PLG/249/2023/2025 पृष्ठ : 04

## अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा की कार्रवाई, दो महिलाओं को कराया आजाद

**वसई ;** देह व्यापार को उकसाने वाले आरोपियों की गिरफ्तारी एवं दो पीड़ित महिलाओं को छुड़ाने में अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष.नालासोपारा टीम को सफलता मिली है। यह कार्रवाई डीसीपी (क्राइम) अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष.नालासोपारा पी.आई संतोष चौधरी के नेतृत्व पुलिस अधिकारी-कर्मचारी की टीम ने की है।यह जानकारी पुलिस अधिकारी ने शुक्रवार को दी है। पुलिस अधिकारी ने बताया कि २९ मार्च को अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष.नालासोपारा को गुप्त सूचना मिली कि वेश्या दलाल (१).हरेश्वर केशव राउत (२).गुंडम्मा रामप्पा भांगी ऊर्फ राजश्री ये महिलाओं को पैसे का लालच देते हैं व वेश्यावृत्ति के लिए महिलाओं को उपलब्ध कराने के लिए अलग-अलग ग्राहकों को अलग-अलग जगहों पर आमंत्रित करते हैं व बदले में.पुरुषों ग्राहको से भुगतान मिलता है.मिली सूचना के आधार पर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष.नालासोपारा के पी.आई संतोष चौधरी ने कानूनी मामलों को पूरा करने के बाद पुलिस स्टॉफ. बोगस ग्राहक और दो पंचों के साथ पेल्हार पुलिस स्टेशन की सीमा के भीतर तुंगारेश्वर फाटा. वसई पूर्व में छापा मारा.इस दौरान आरोपी (१).हरेश्वर केशव राउत.निवासी-चिखल डोंगरी.विरार पश्चिम व (२).गुंडम्मा रानप्पा भांगी ऊर्फ राजश्री.निवासी-अंधेरी मुंबई को हिरासत में लिया और उनके द्वारा अपराध में प्रयुक्त रिक्शा भी शामिल कुलमिलाकर ०१.०२.६७० रुपये का माल जप्त किया गया है तथा दो पीड़ित महिलाओं को देह व्यापार से मुक्त कराया गया है।

उक्त मामले में पुलिस हवलदार बापू पवार द्वारा पेल्हार थाने में आरोपियों पर कलम ३७० (१) (३). ३४ सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कानून १९५६ कलम ४.५ के तहत एफआईआर दर्ज करवाया है।आगे की तहकीकात पुलिस कर रही है।

Scanned with CamScanner

लोकमत

# अमली पदार्थ पिणारे अटकेत

नालासोपारा : पेल्हार पोलिसांनी शुक्रवारी सकाळी गावराई पाडा नाका आणि पांडेनगर परिसरात अमली पदार्थ पिणाऱ्या तीन आरोपींना पकडले आहे. अभिषेक रवींद्र राजभर (१८), अमन ब्रिजेश जैस्वार (१९) आणि आशिष शंकर गुप्ता (१९) अशी पकडलेल्या तीन आरोपींची नावे आहेत. पेल्हार पोलिसांनी वेगवेगळे तीन गुन्हे दाखल केले आहे.

Hello Vasai
Page No. 1 Apr 02, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

लोकमत इन्फोग्राफिक्स

# पोलिस भरतीसाठी लेखीची तयारी झाली का?



मंगेश कराळे। लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : पोलिस शिपाई पदाची लेखी परीक्षा २ एप्रिल रोजी भाईंदर येथील दोन परीक्षा केंद्रांवर घेतली जाणार आहे. १२ हजार १२४ उमेदवार लेखी परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत. पोलिस शिपाई पदावर आपली निवड व्हावी, यासाठी मैदानी परीक्षा आटोपल्यानंतर पात्र ठरलेले उमेदवार लेखी परीक्षेची जोमाने तयारी करीत असल्याचे दिसून येत आहे. पोलिस भरतीची लेखी परीक्षा प्रक्रिया पारदर्शक, तटस्थपणे, निपक्षपातीपणे पार पाडण्याकरिता सर्व स्तरावर विशेष उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

## ९८६ पदांसाठी भरती

पोलिस शिपाई पदाच्या एकूण ९८६ जागा आहेत. लेखी परीक्षेसाठी सुमारे १२ हजार १२४ उमेदवार पात्र ठरले आहेत. त्यांची आज रविवारी २ एप्रिलला परीक्षा होईल.



## मैदानी चाचणी पूर्ण

आयुक्तालयातील पहिली पोलिस भरती शारीरिक चाचणी २ जानेवारी पासून भाईंदर (प.) येथील नेताजी सुभाषचंद्र बोस या मैदानात पोलिस बंदोबस्तात व इन कॅमेरा पार पडली. त्याची सांगता २२ फेब्रुवारीला झाली.

## आता रविवारी लेखी परीक्षा

उमेदवारांची लेखी परीक्षा रविवारी सकाळी साडे आठ ते दहा वाजण्याच्या दरम्यान पुरुष उमेदवारांसाठी भाईंदरच्या नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान व महिला उमेदवारांसाठी भाईंदरच्या स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे मैदान येथे घेण्यात येणार आहे. पोलिस शिपाई लेखी परीक्षेसाठी पात्र असलेल्या उमेदवारांनी रविवारी सकाळी ५ वाजता हजर राहण्याचे आवाहन केले आहे.

## परीक्षेला जाताना ही कागदपत्रे जवळ ठेवा

प्रवेशपत्र डाऊनलोड करून स्पष्ट दिसेल, अशी प्रिंट काढावी. तसेच पासपोर्ट साईज २ कलर फोटो, आधार कार्ड, पॅन कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स सोबत आणणे बंधनकारक आहे.

## कोणतेही इलेक्ट्रिक यंत्र बाळगू नये

उमेदवारांनी मोबाइल, डिजिटल वॉच, गणकयंत्र, ब्लूटूथ, हेडफोन व इतर कोणतेही इलेक्ट्रॉनिक यंत्र जवळ बाळगण्यास सक्त मनाई आहे. तसे निदर्शनास आल्यास कारवाई केली जाईल.

Hello Vasai
Page No. 2 Apr 02, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner